**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६३ दिनांक २५/१०/२०२४**

# अवैध दारुसाठा बाळगणाऱ्या आरोपींवर स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून कारवाई

आगामी सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणारे इसम यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी अवैध दारुसाठा बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढून दिनांक २४/१०/२०२४ रोजी रात्री ११.०० वाजण्याचे सुमारास घोलवड पोलीस ठाणे हद्दीतील आरोपी शशांक अशोक धोडी वय ३२ वर्षे, रा. वेवजी नानापाडा ता. तलासरी जि. पालघर हा त्याचे राहते घराचे पाठिमागे शेडमध्ये एकूण २७,१९,६८०/- रुपये किमतीची महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी प्रतिबंधीत असलेली दारु साठा करुन बाळगली असताना मिळून आल्याने नमूद आरोपीस ताब्यात घेऊन त्याचे ताब्यातील खालीलप्रमाणे अवैध दारुचा साठा जप्त केलेला आहे.

१) १२,१२,९६० /- रुपये किंमतीची रॉयल स्टेकक्लासिक कंपनीची १८० मिलीची रोयल विस्कीचे एकुण १३३ बॉक्स एका बॉक्स मधे ४८ बॉटल एकाबॉटलची विक्रिची स्थानिक किंमत १९० रुपये आहे अश्या एकुण ६३८४ बोटल व ११४९.१२ लिटर
२)१,२४,८०० /- रुपये किमतीची मॅजिक मोव्हमेटस ग्रीन ॲपल फलेवर वोडका ७५० मिलीची एकूण १३ बॉक्स एका बॉक्स मध्ये १२ बोटल एका बॉटलची विक्रिची स्थानिक किंमत ८०० रुपये प्रमाणे अश्या एकुण १५६ बॉटल व ११७ लिटर.
३) १,४४,००० /- रुपये किमतीची मॅजिक मोव्हमेटस ग्रीन ॲपल फलेवर वोडका १८० मिलीची एकुन १५ बॉक्स. एका बॉक्स मध्ये ४८ बोटल एका बॉटलची विक्रिची स्थानिक किंमत २०० रुपये प्रमाणे अश्या एकुण ७२० बॉटल व १२९.६ लिटर.
४) ८३,५२०/-किमतीची ओल्ड मंकडिलक्स रम ट्रिपल एक्स १८० मिलीची एकुन १२ बॉक्स एका बॉक्स मध्ये ४८ बोटल एका बॉटलची विक्रिची स्थानिक किंमत १४५ रुपये प्रमाणे अश्या एकुण ५७६ बॉटल व १०३.६८ लिटर.
५)६,५५,२००/- किंमतीची रॉयल स्टेक कंपनीची ७५० मिलीची एकुण ७० बॉक्स एका बॉक्स मधे १२ बॉटल एका बॉटलची विक्रिची स्थानिक किंमत ८४० रुपये आहे अश्या एकुण ७८०बोटल व ६३० लिटर.

६) ४,६८,४८० /- रु इंम्पेरियल ब्लु कंपनीची हॅन्ड पिक व्हिस्की १८० मिली ची एकुण ६१ बॉक्स. एका बॉक्स मधे ४८ बॉटल. एका बॉटलची विक्रिची स्थानिक किंमत १६० रुपये प्रमाणे आहे. अश्या एकुण २९२८ बोटल व ५२७.०४ लिटर.

७)३०,७२० /- रु इंम्पेरियल ब्लु कंपनीची हॅन्ड पिक व्हिस्की ७५० मिली ची एकुण ०४ बॉक्स. एका बॉक्समधे १२ बॉटल. एका बॉटलची विक्रिची स्थानिक किंमत ६४० रुपये प्रमाणे आहे. अश्या एकुण ४८ बोटल व ३६लिटर.

असा एकूण २७,१९,६८०/- रुपये किंमतीची एकूण २६९२.८ लिटर मुद्देमाल जप्त केलेला आहे.

सदर बाबत घोलवड पोलीस ठाणे गुरनं १४७/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्ह्याचा तपास पोउपनि/परमेश्वर जाधव, नेमणुक घोलवड पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, मा. श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे श्री. अनिल लाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, डहाणु विभाग, पोनि/प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा पालघर, सपोनि/गजानन पडळकर, प्रभारी अधिकारी घोलवड पोलीस ठाणे, श्रेपोउपनि/सुनिल नलावडे, पोहवा/संदिप सुर्यवंशी, पोहवा/नरेंद्र पाटील, पोहवा/कैलास पाटील, पोहवा/दिनेश पाटील, पोहवा/दिपक राऊत, पोहवा/राकेश पाटील, पोअं/विशाल नांगरे सर्व नेम. स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी उत्कृष्टरित्या पार पाडलेली आहे.